महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/संस्था माहिती /२०२० / ३५२ दिनांक : 04 DEC 2020

<u>कालमर्यादा दि. ७.१२.२०२० दु. २.०० वाजेपर्यंत</u>

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.....

**संदर्भ :** संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०/२८९ दि.२१.१०.२०२०

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षासाठी तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक असण्याच्या दृष्टीकोनातून संस्थांची शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती http://dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. त्यानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने मंजूर प्रवेश क्षमता व इतर अनुषंगिक माहिती संस्थांनी प्रमाणित केलेली असून सदर माहिती http://institute.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर दर्शविलेली आहे.

त्या अनुषंगाने या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना याद्वारे पुन: कळविण्यात येते की, उपरोक्त लिंकवर असलेली संस्थेची माहिती अद्ययावत असल्याची संस्थेचे प्राचार्य/संचालक यांनी व्यक्तीश: खात्री करावी. संस्थेच्या माहितीची पडताळणी करुन प्रवेशक्षमतेत काही तफावत अथवा त्रुटी असल्यास त्याबाबतची अचूक माहिती दिनांक ०७.१२.२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत ई मेल द्वारे desk2a@dtemaharashtra.gov.in व संबंधित विभागीय कार्यालयास कळवावी. सदर बदल कळविताना **ई मेल च्या विषयामध्ये 'Updating Institute Data for < Institute Code and Name > CAP 2020 regarding' असे स्पष्ट नमूद** करावे.

ज्या संस्थां माहितीत काही बदल करण्याबाबत कळविणार नाही त्यांची माहिती अद्ययावत आणि अंतिम असल्याचे समजण्यात येऊन सदर माहिती शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर माहितीमध्ये कोणतीही चूक आढळून आल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार असेल याची नोंद घ्यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून दयावे .

३. कार्यासन क्रमांक ३ (माहिती तंत्रज्ञान कक्ष),मुख्य कार्यालय,मुंबई- यांना कळविण्यात येते की, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या संस्थांकडून माहितीत बदल असल्याचे कळविण्यात आल्यास तो बदल प्रमाणित करुन माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.